**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०३ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०७/०८/२०१९.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ)अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०३, बुधवार दिनांक १४ / ०८ /२०१९.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती.............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १४/०८/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ३ बुधवार दिनांक १४ / ०८ / २०१९ रोजी दुपारी १.०० वाजता **(राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे** होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १३ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| १४ | मौजे - बु-हाणनगर ता.नगर येथील सर्व्हे नं.४५/२ब मधील प्लॉट नं.१ व २ चे ७१९.०० चौ.मी. जागा तपोवन डि.पी. रस्त्या करीता संपादनाबाबत. |
| १५ | श्री संत आनंदऋषीजी महाराज व्यापारी संकुलातील अनामत रक्कम परत करणे बाबत.<br>संदर्भ - श्री.रामदास रावसाहेब बुलाखे यांचा अर्ज दि.३१/३/१७ दि.२४/५/१७ |
| १६ | श्री. मच्छिंद्र धृपद म्हस्के, बिगारी / वॉचमन यांचे रूपये तीन लाखाचे पुढील वैद्यकीय खर्चाचे प्रतिपूर्ती देयक अदाई बाबत<br>संदर्भ- १. मा.शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. वैधप्र २०१६ /प्र.क्र.१६/ २०१६/ शकावि-२ दिनांक मार्च २०१६<br>२. मा. महासभा ठराव क्र.३० दि.०७/१२/२०१६ |
| १७ | सावेडी जॉगींग पार्क हे भाडेने देऊ नये याबाबत...<br>संदर्भ :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे, महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.०८/०३/२०१९ रोजी दिलेल्या पत्रान्वये.<br>२) मा.श्री.महेंद्र गंधे मा.श्री.मनोज दुलम, नगरसेवक मा.श्रीमती.आशाताई कराळे नगरसेविका व जॉगींग पार्क परिसरातील नागरिकांनी दिलेल्या निवेदनान्वये. |
| १८ | मा.केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना राबविणे कामी संपवेल व पंप हाऊससाठी चाहुराणा बु.स.नं.६६/१ रेखांकनामधील ॲमेनिटीचे क्षेत्र ११२०.७५ चौ.मी.इतके भुसंपादन करणे बाबत...<br>१) म.जी.प्रा.चे जा.क्र.२२७५ दि.२९/०८/२०१७ चे पत्र.<br>२) स.सं.न.र.अहमदनगर यांचे पत्र क्र.५६०८ दि.१८/०९/२०१७ चे पत्र.<br>३) या कार्यालयाचे पत्र क्रं.५८४ दि.०५/०९/२०१७ चे पत्र.<br>४) मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचे दालनात दि.०४/१०/२०१८ रोजी झालेली आढावा बैठक.<br>५) या कार्यालयाचे पत्र क्र.१६८४ दि.०२/०४/२०१९ रोजीचे पत्र. |
| १९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०७/०८/२०१९

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १३** **दिनांक : १४ /०८/२०१९**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| 1 | आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ विचारवंत, बंडखोर लेखक आणि दलित पँथर या सामाजिक संघटनेचे संस्थापक राजा ढाले यांचे दिनांक 15/07/2019 रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवट्याचा प्रस्ताव. |
| 2 | दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आणि दिल्ली कॉंग्रेसच्या अध्यक्षा शीला दीक्षित यांचे दिनांक 20/07/2019 रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवट्याचा प्रस्ताव. |
| 3 | ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या निर्मलाताई पुरंदरे यांचे दिनांक 20/07/2019 रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवट्याचा प्रस्ताव. |
| 4 | कॉंग्रेस नेते, माजी मंत्री जयपाल रेड्डी यांचे दिनांक 28/07/2019 रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवट्याचा प्रस्ताव. |
| 5 | भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या ,माजी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांचे दि. 06/08/2019 रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवट्याचा प्रस्ताव. |

**चर्चा :-**

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** पुरग्रस्तांसाठी १ महिन्याचे वेतन सर्व नगरसेवकांनी द्यावे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** कोल्हापूर, सांगली, सातारा याठिकाणच्या पुरग्रस्तांसाठी रा.स्व.संघ जनकल्याण समिती देखील मदतीकरीता निधी जमा करीत आहे. रा.स्व.संघ जनकल्याण समितीस यातील काही रक्कम देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** स्वप्नील शिंदे यांनी जो प्रस्ताव आता मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** जे जे म्हणणे नगरसेवक मांडतील त्यानुसार कार्यवाही करु.

**दुखवटयाचे प्रस्तावाचे वाचन करा.**

**मा.सौ.सुरेखा कदम :-** भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी परराष्ट्र मंत्री सुषमाजी स्वराज यांचे नुकतेच निधन झाले त्यांना तसेच कोल्हापूर सांगली येथील पुरात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना माझ्या परिवाराचे वतीने व पक्षाच्या वतीने अभिवादन करते.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** शिलाताई दिक्षीत तसेच भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सुषमा स्वराज या चांगल्या संसदपटू ओळखल्या जायच्या भारतीय जनता पार्टीच्या त्या प्रेरणा होत्या त्यांना भारतीय जनता पार्टी व माझे परिवाराच्या वतीने आदरांजली वाहते.

---*---

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता कोल्हापुर, सांगली, सातारातील पुरग्रस्तांसाठी मदत करणेकामी मा.सदस्यांचे जुलै - २०१९ या महिन्याचे मानधन रक्कम रु. ६,८०,०००/- या रक्कमेपैकी रक्कम रु.५.४० लक्ष **" मुख्यमंत्री सहाय्यता निधी "** मध्ये व भारतीय जनता पक्षाचे १४ नगरसेवक यांची पुरग्रस्तांसाठी मदत करणेकामी त्यांचे मानधन रक्कम रुपये १ लाख ४० हजारचा धनादेश **"रा.स्व.संघ जनकल्याण समिती"** अहमदनगर यांचे मार्फत देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदरचे दोन्ही धनादेश तातडीने देणेच्या दृष्टीने संबंधित विभागाने त्वरीत कार्यवाही करावी.

नियमानुसार उचित कार्यवाही करावी.

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १४** **दिनांक :१४ / ०८ /२०१९.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मौजे - बु-हाणनगर ता.नगर येथील सर्व्हे नं.४५/२ब मधील प्लॉट नं.१ व २ चे ७१९.०० चौ.मी. जागा तपोवन डि.पी. रस्त्या करीता संपादनाबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

महानगरपालिकेस मंजूर विकास योजनेतील नगर-औरंगाबाद मार्गा लगत इंद्रायणी हॉटेल ते कॉटेज कॉर्नर मनमाड रोड पर्यंत २४.०० मीटर रुंदीचा तपोवन जोड रस्त्याकरीता बु-हाणनगर येथील श्री.नंदलाल जोशी यांचे मालकीचे सर्व्हे नंबर २४/२ब मधील प्लॉट नं.१ व २ चे ७१९.०० चौ.मी.बाधीत होत आहे.

त्याची सन २००९ प्रमाणे शिघ्र सिध्द गणक दर १६५०/- प्रमाणे सरकारी नियमाप्रमाणे आकारणीची रु.११,८६,२५०/- येत असलेली रक्कम नमुद करुन खालील विषया बाबतचे निर्णयासाठी दिनांक २७/११/२००९ अन्वये मा.महासभेपुढे प्रस्ताव सादर केलेला होता.

१) विषयांकित जागेच्या भूसंपादनास धोरणात्मक मंजूरी.

याबाबत प्रथम खाजगी वाटाघाटीने जागा संपादन करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यास असफलता प्राप्त झाली तर भूसंपादनाच्या माध्यमातुन जमीन संपादीत करणे

२) येणा-या खर्चास धोरणात्मक मंजूरी.

वरिल प्रस्ताव मंजूर झाल्यास जमिनीचे तपशीलवार मुल्यांकन करण्यांत येईल व त्यास स्थायी समितीची मंजूरी घेण्यांत येईल व त्यानंतर खाजगी वाटाघाटी करण्यांत येतील. अशा वाटाघाटी करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे बाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा.महासभेचे ठराव क्रमांक १२ दिनांक २२/०९/२०१० अन्वये वरील मंजूर विषय -१ मध्ये नमुद केलेप्रमाणे जमिन मालकाशी केलेल्या चर्चेनुसार वाटा घाटीस असफलता आल्याने मा.महासभेने व मा.आयुक्त यांचे मतंजूरी प्रमाणे रस्त्या करीता बाधित होणारी जागा भू-संपादनाच्या माध्यमातुन हस्तांतरीत करुन घेणेचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांना इकडील दिनांक ३०/०५/२०१२ रोजी प्रस्ताव सादर केलेला होता त्यात मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नविन भू-संपादन कायदा २०१३ अन्वये मागणी केल्या प्रमाणे प्रस्ताव तयार करुन ११/११/२०१६ रोजी सादर केलेला आहे. जमिन मालकाने वाटाघाटीने थेट खरेदी बाबत ११/०४/२०१७ रोजी दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, नगर भाग नगर यांनी घेतलेल्या संयुक्तीक बैठकीत इकडील प्रतिनिधीनी भू-संपादनास संम्मती दिलेली आहे. व तसा अहवालही सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रस्तावात मा.जिल्हाधिकारी, यांचे अध्यक्षते खालील थेट खरेदी पध्दतीने जमिन घेणेसाठी मोबदला निश्चीती बाबत स्थापन केलेल्या जिल्हा स्तरीय समितीने रु.१,०७,९६,२९४/- निश्चित केलेली आहे. (प्रपत्र-१ प्रमाणे) त्यात खरेदी खत करुन घेणे, अधिकार अभिलेख, अद्यावत करणे, दस्तऐवज जतन करणे, इत्यादी बाबत पुढील कार्यवाही करण्याचे उप विभागीय अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ०३/०९/२०१८ अन्वये इकडेस कळविलेले आहे. (सोबत पत्र)

प्रश्नाधिन प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली मोबदला रक्कम संबंधित जमिन मालक यांना अदा करणे आवश्यक आहे. तसंच जमिन मालकाने भू-संपादना बाबत मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक ६४०६/२०१६ दाखल केलेली आहे.

मा.न्यायालयात सुनावणी चालू आहे. अभिकर्त्यांस तातडीने मोबदला रक्कम अदा करणे बाबत न्यायालयाचे आदेश देणेची शक्यता आहे.

सबब प्रश्नाधिन प्रकरणात महासभेने मंजूर केलेल्या विषया बाबतची कार्यवाही पुर्ण झालेली असून बाधित होणा-या ७१९ चौ.मी.जागेची समितीने निश्चित केलेली देय १,०७,९६,२९४/- (अक्षरी - एक कोटी सात लाख शहान्नव हजार दोनशे चौ-यांन्नव मात्र) मोबदला रक्कम रुपये जमिन मालक श्री.नंदलाल जोशी यांना अदा करणेसाठी येणा-या खर्चास मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने प्रस्ताव सादर केलेला आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा -**

**मा.महापौर साहेब :-** विषयाचे वाचन करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** या विषयाचे संबंधित अधिकारी यांना माहिती देण्यासाठी बोलवा. हा जो रस्ता आहे त्या जागेची मालकी महानगरपालिकेच्या मालकीची आहे का. रस्ता पालिका हद्दीत आहे का.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** हा जो तपोवन रस्ता औरंगाबाद रोड ते पिंपळगांव रस्ता हा बु-हाणनगर - महानगरपालिका बॉन्ड्रीवर हा रस्ता आहे. ही जमीन मनपा हद्दीच्या बाहेर आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** महानगरपालिका कायद्याने संपादन करता येते का.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** २०१० साली महानगरपालिकेचा ठराव झालेला आहे. रस्त्यात दगडी भिंत बांधली होती. रहदारीस अडचण येत होती. नागरिकांनी मागणी केल्यानुसार ठराव झालेला आहे.

२००१ साली रिजनल प्लॅन मध्ये २४ मीटर रुंदीचा रस्ता दर्शविला आहे. २०१२ साली डी.पी.प्लॅन मध्ये २४ मीटर दर्शविला आखणी निश्चीत करण्या अगोदर २४ मीटर रस्ता दर्शविला.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** हा जो रस्ता आहे महानगरपालिका मार्फत जर रस्ता म्हणून काही करता येत असेल व्यवस्थीत मूल्यांकन देवून रस्ता करता येत असेल तर करा.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** मूल्यांकन २०१३ अन्वये कायद्याखाली मा.जिल्हाधिकारी यांचे समितीत मूल्यांकन ठरविलेले आहे. त्यामध्ये आपल्यास बदल करता येत नाही. हे क्षेत्र खाजगी आहे यात काही शंका नाही.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** हा रस्ता आपल्या हद्दीत नाही व आपल्या मालकीचा नाही मग त्या रस्त्याची किंमत आपण अदा कशी करायची हे कायदेशीर धरुन नाही. न्यायालयात सुनावणी चालू आहे. न्यायालयाचे आदेश येण्याची शक्यता आहे. असे रिपोर्ट मध्ये उल्लेख आहे. न्यायालय कसा निर्णय देईल असे कोणी लिहिले कोणाला माहिती न्यायालय असा निर्णय देईल म्हणून, उच्च न्यायालयात केस चालू असेल तर आपल्या वकीलांनी पालिकेची बाजू मांडली नाही का. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता आपण रक्कम देवू शकत नाही. जागा आपल्या हद्दीन नाही. त्यामुळे आपण रक्कम देवू नये असे माझे मत आहे.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** केडगांव पुल ते देवी मंदिर पर्यंत रस्त्याचे काम नगरोत्थान योजनेतून करण्यात आले. याच रस्त्या मध्ये जागा मालकाने त्या ठिकाणी भिंत बांधली आहे. उद्या त्या ठिकाणी अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोणाची निश्चीत करणार. किती दिवस झाले रस्ता असाच अडवून ठेवला. जागा मालक महानगरपालिकेची अडवणूक करीत आहे.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** याच जागा मालकाने गुलमोहोर रोडवर मिठाईचे दुकानाची जागा सोडून अतिक्रमण केले आहे. त्यांचेवर कारवाई का करत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** हा जो रस्त्याचा भूसंपादन संदर्भात मागच्या सभेच्या वेळेस विषय स्थगीत ठेवला होता तो आज पुन्हा आला आहे. एक समिती कलेक्टर साहेब यांनी स्थापीत केली आहे त्या समितीने १ कोटी ७ लाख मोबदला द्यायला सांगीतला. त्यांनी जर रक्कम ठरवली असेल तर आपण ती रक्कम का द्यायची जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद यांनी द्यावी. आपल्या ताब्यात जागा आहे का ?

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** मनपा सिमेवर रस्ता आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद यांनी जर मंजूरी दिली असेल तर या सभागृहाचे मंजूरीची गरज काय.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** सन २०१० साली ठरावाच्या अनूषंगाने मा.जिल्हाधिकारी यांनी रक्कम निश्चित केली आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** ३ कोटी रुपये रस्त्यासाठी निधी प्राप्त झाला त्याचे टेंडर अद्याप निघाले नाही. आपल्या हद्दीतील रस्त्यासाठी ही तरतुद केली आहे. शिघ्र गणक दर २००९ सालचा आहे. आजचा रेट चालू रेडीरेकनर नुसार तुम्ही मूल्यांकन का काढले नाही. आज रेडीरेकनरचा दर १६५० होवू शकतो का. आज काय दर आहे. सभागृहाला समजू द्या त्याचे पैसे किती होतात.

**मा.महापौर साहेब :-** चर्चेवरून असे दिसते या जोशींचा व्यवसाय आहे का. आपला मनपाचा रस्ता आडवायचा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** नवीन कलेक्टर ऑफीस जवळचा रस्ता फकीर व सोले यांनी अडवीला त्यांचा विषय का घेतला नाही. त्या ठिकाणी अर्धवट रस्ता केला आहे. ४० कोटी रुपये च्या कामांमध्ये विभागीय आयुक्तांकडे प्रतिज्ञापत्र आपण करुन दिले. पूर्ण रस्ता आपल्या ताब्यात आहे. असे ॲथॉरिटी केली आहे. तो ठेकेदार २ ते २.१० कोटी घेवून गेला आहे. असे अर्धवट अनेक रस्ते नगर शहरात आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आजचा चालू दर काय आहे.

**मा.महापौर साहेब :-** चालू दराची माहिती द्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** तुम्ही या महानगरपालिकेला कोणी वेठीस न धरता जागा देत असेल तर टीडीआर च्या माध्यमातून रक्कम द्यावी रोख रक्कम देवू नये.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** केडगांव पुल ते देवी मंदिरापर्यत करण्यात आलेल्या रस्त्यामधील पुलाजवळ काही भागात रस्ता अर्धवट झाला आहे आता नवरात्र उत्सव जवळ आला आहे नागरिकांना जाण्या येण्यासाठी त्रास होतो जागा मालकाकडून रस्ता ताब्यात घेवून रस्ता पूर्ण करण्यात यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** हा रस्ता आपल्या हद्दी बाहेर आहे. याबाबत शासनाचे मत मागविण्यात यावे. कायदेशीर प्रश्न आहे. कायद्याच्या चौकटीत बसवून निर्णय घ्यावा.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** पूर्वी ठराव केंव्हा झाला.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** २०१० साली ठराव झाला आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** समिती समोर ही जागा महानगरपालिकेच्या हद्दीत नाही हे म्हणणे मांडले नाही का ?

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** सहा.संचालक, प्रांताधिकारी हे सदस्य या समितीत आहे. जागा जिल्हापरिषदेची नाही. जोशी यांच्या मालकीची आहे. रस्ता मनपा बॉन्ड्रीवर आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** रक्कम आपण महानगरपालिकेने का द्यायची जिल्हा परिषदेने भरली पाहीजे. तपोवन रस्ता होणे गरजेचे आहे. जागा मालकाने इतर ठिकाणी त्यांनी अतिक्रमण केले आहे त्याकडे महानगरपालिकेने लक्ष द्यावे.

सभागृहातील बरेच सदस्यांनी जागा मनपाच्या ताब्यात नसल्याने ऑडीटर यांनी मोबादला देता येतो का याबाबत माहिती दयावी .

**मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :-** सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने व जागा महानगरपालिकेच्या हद्दीत नसल्याने नगरविकास विभागाचे मार्गदर्शन घेणे योग्य होईल.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** महानगरपालिकेस वेठीस धरण्याचे काम हे जागा मालक करतात त्यांचेही अतिक्रमण पहा. देवी रस्त्यावर त्यांनी भिंत बांधून ठेवली आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :-** २० वर्षापासून तपोवन रस्ता पडून आहे. मा.आमदार यांनी या रस्त्यासाठी निधी आणला आहे. एमआयडीसी कडे जाणा-या लोकांचे हाल होणार नाही या प्रश्नी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** जी जागा आपल्या मालकीची नाही मग या जागेचे व्हॅल्युएशन काढायचे कशाला रस्ता व्हायला पाहीजे यात दुमत नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** जी जागा आपल्या हद्दीतच नाही मग आपली जबाबदारी कशी. कोणत्या नियमात बसते ते सांगा. जागा मालकाने मागणी केली तो त्यांचा हक्क आहे. कोर्टात म्हणणे मांडतांना आपले मनपाचे वकील माहिती देण्यास कमी पडले. अजेंडयावर विषय घेतलाच कसा.

**मा.महापौर साहेब :-** जागेबाबत काय निर्णय घ्यायचा तो घ्या मा.न्यायालयाने असे आदेश दिलेले आहेत.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** कलेक्टर यांनी अन्य फंडातुन किंवा जिल्हा परिषदेने ती रक्कम द्यावी.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** सध्या जमिनीचा दर ३,३१०/- झालेला आहे. आज तो दर दुप्पट झाला आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** जागा मनपाच्या हद्दीत नाही. जागेचा मोबादला दयावा किंवा कसे याबाबत मा.शासनाचे मत मागविणे कायदेशीर दृष्टया योग्य होईल .

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आपण पैसे का द्यायचे. टेंडर जिल्हा परिषद, पीडब्ल्यूडी कडून काढणार होते.

**मा.महापौर साहेब :-** महानगरपालिकेच्या लिगल रिटेनर यांचे मत जाणून घेवून हे प्रकरण मा.शासनाकडे पाठवुन देवू. शासनाकडे जो निर्णय होईल त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट बाबत मा.महासभेत झालेली चर्चा पाहता मा.सदस्यांनी सदर बाबत मा.शासनाचे मार्गदर्शन घ्यावे असे सुचित केले. यास्तव मौजे - बु-हाणनगर ता.नगर येथील सर्व्हे नं.४५/२ब मधील प्लॉट नं.१ व २ चे बाधीत होणा-या ७१९.०० चौ.मी. जागेची समितीने निश्चित केलेली देय रक्कम रूपये १,०७,९६,२९४/- मोबदला जमिन मालक श्री नंदलाल जोशी यांना अदा करावे किंवा कसे याबाबत मा.नगर विकास विभाग यांचे मार्गदर्शन मागविणे कामी मनपाच्या विधी सल्लागार यांचे मत घेवून सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणे बाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. मा.शासनाचे याबाबत मार्गदर्शन प्राप्त झाल्यास त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सूचक :-** मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

**अनुमोदक :-** मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १५** **दिनांक :१४ / ०८ /२०१९.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** श्री संत आनंदऋषीजी महाराज व्यापारी संकुलातील अनामत रक्कम परत करणे बाबत...

संदर्भ - श्री.रामदास रावसाहेब बुलाखे यांचा अर्ज दि.३१/३/१७ दि.२४/५/१७.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंतीपुर्वक सादर करण्यात येतो की, श्री.संत आनंदषी महाराज व्यापारी संकुलातील अनामत रक्कम परत करणेबाबत श्री. रामदास रावसाहेब बुलाखे यांचा दि.३१-३-२०१७ व दिनांक २४-५-२०१७ चा अर्ज देऊन गाळा क्र.४ ची अनामत रक्कम परत मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

तरी अर्जदार श्री. रामदास रावसाहेब बुलाखे यांनी मनपाचे सर्व कर गाळा भाडे व घरपट्टी संपुर्ण रक्कमेचा भरणा केला आहे तसेच त्यांनी सा.पा क्र.४८८१४१ दि.२८-१-२०१४ अन्वये रु.१२००००/- भरलेली अनामत रक्कम आहे.त्याची पावती गहाळ झाल्याने त्यांनी दि.२२-८-२०१७ रोजी ॲफ़ेडेव्हीट करुन दिले आहे .

तरी अनामत रक्कम परत करणेस अकौंट विभागास आदेश होणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १९०(४) नुसार मा.महासभेची मान्यता घेवून कार्यवाही करण्यांत यावी.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, चर्चा करणे

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मार्केट विभाग प्रमुख श्री.वखारे :-** सदर डिपॉझिट करीता ३ वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी झाल्याने रक्कम परत करावी लागणार आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सन २०१३ ला एक ठराव झालेला आहे. कोणाचीही रक्कम फॉरफीट झाली असेल तर ती परत देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** देवून टाकू. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.वखारे :-** सन २०१३ पूर्वीच्या प्रकरणापुरता ठराव होता.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** असे जर आणखी डिपॉझिटची प्रकरणे असतील तर त्यांना ऑफिस रिपोर्ट मंजूर करुन डिपॉझिट परत देण्यांत यावे.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** काटवन खंडोबा रोड आपल्या कडे आहे का नाही. किती जणांनी याबाबत अर्ज दिलेला आहे.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** आपल्या हद्दीत रस्ता आहे. आपल्या मालकीचा आहे. ५० फुट रुंदीचा रस्ता आहे. जसे ले-आउट मंजूर होत जातील तसा तो विकसीत होईल.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** हा रस्ता मा.महापौर यांनी पाहणी करावी. निवेदन दिले त्याला रिप्लाय सुध्दा नाही. मुरुम सुध्दा टाकला जात नाही.

**मा.महापौर साहेब :-** रस्त्याची पाहणी करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** बोल्हेगांव जवळ दीड एकर ओपन स्पेस आहे. भूसंपादन मध्ये रक्कम शिल्लक आहे. बोल्हेगांव विकास आघाडी ही संस्था गार्डन करणार आहे. हवेतील ऑक्सीजनचे प्रमाण वाढवण्यासाठी तेथे काम करणार आहे. संपूर्ण खर्च उद्यानाचा ते करायला तयार आहेत. जी झाडे कमी ऑक्सीजन देतात. अशी झाडे लावले जातात. शोभेची झाडे लावण्यापेक्षा ऑक्सीजन जास्त देणारी झाडे लावणे आवश्यक आहे. इतर महानगरपालिकेमध्ये अशी उद्याने उभारणी केली आहेत. आपल्याला त्या माणसाकडून जागेचे भूसंपादन केले पाहीजे. हाजी नजीर यांचे ले-आउट शेजारची जागा माझे मते ग्राउंडचे आरक्षण आहे.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** टीडीआर च्या माध्यमातुन आपण रक्कम देवू शकतो. रोख पैसे देवून आपण भूसंपादन करु शकत नाही. मोठे रस्ते भूसंपादनाच्या रक्कमेतुन घेणार आहोत. प्रेफन्सशीटच्या जागेत ही जागा येत नाही. A R ची एक स्कीम आता आलेली आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** दफन भूमीच्या आरक्षणाला किती टक्केवारी आहे.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** ५० टक्के तरतुद आहे.

**मा.महापौर साहेब :-** शेतकरी जर इथे आणले तर किती दिवसात रिझर्व्हेशन मार्गी लागेल.

**मा.सौ.सोनाली चितळे :-** पथदिव्या साठी एलईडी चा वापर करावा असे जी.आर. शासनाने काढलेला आहे. नगरसेवकांना माहिती का दिली नाही.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** त्यावेळी मी बाहेरगावी होतो. एलईडी दिवे खरेदीबाबत प्रोसेस चालू आहे. १५० वॅट फिटींग अद्याप एकही मिळाली नाही.

**मा.सौ.चितळे सोनाली :-** माहिती का नाही पुरवली जात.

**मा.महापौर साहेब :-** शासनाचे जी.आर. सर्व नगरसेवक पदाधिकारी यांना कळविण्यांत यावेत.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. श्री संत आनंदऋषीजी महाराज व्यापारी संकुलातील गाळा क्र.४ ची श्री. रामदास रावसाहेब बुलाखे यांनी भरलेली अनामत रक्कम रु.१,२०,०००/- परत मिळणेबाबत केलेल्या अर्जानुसार फॉरफीट झालेली डिपॉझिट रक्कम अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १६** **दिनांक :१४ / ०८ /२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. मच्छिंद्र धृपद म्हस्के, बिगारी / वॉचमन यांचे रूपये तीन लाखाचे पुढील वैद्यकीय खर्चाचे प्रतिपूर्ती देयक अदाई बाबत

संदर्भ- १. मा.शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. वैधप्र २०१६ /प्र.क्र.१६/ २०१६/ शकावि-२ दिनांक मार्च २०१६

२. मा. महासभा ठराव क्र.३० दि.०७/१२/२०१६

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

कर्मचा-याचे नांव :- श्री.मच्छिंद्र धृपद म्हस्के,

पदाचे नांव :- बिगारी / वॉचमन

हॉस्पीटलचे नांव :- ग्रँट मेडिकल फौंन्डेशन, रुबी हॉल क्लिनीक पुणे.

आंतररुग्ण कालावधी :- दिनांक १९/१०/२०१६ ते दिनांक ०२/११/२०१६

अ.

| औषधांचा खर्च | |
|---|---|
| एकूण खर्च | एकुण खर्चाच्या ९० % |
| ८२,१२४/- | ७३,९१२/- |

ब.

| वास्तव्याचा खर्च | वास्तव्य खर्चाच्या ९०% |
|---|---|
| एकुण खर्च १,९८,२११/- | १,७८,३९०/- |
| SDU | |
| ५०००x१ = ५०००/- x ७५ % | ३,७५०/- |
| अतिदक्षता विभाग कक्ष (NTU) | |
| ५५०० x१४ = ७७,०००/- १००% | ७७,०००/- |
| एकुण | २,५९,१४०/- |

एकुण खर्च = अ + ब

३,३३,०५२/- = ७३,९१२/- + २,५९,१४०/-

इतकी रक्कम मंजूरीस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की. मु.ले.अ., मु.ले.प. मार्फत सादर करावे.

यावर फेरसादर रिपोर्ट की,

कर्मचा-याचे नांव :- श्री.मच्छिंद्र धृपद म्हस्के,

पदाचे नांव :- बिगारी / वॉचमन

हॉस्पीटलचे नांव :- ग्रँट मेडिकल फौंन्डेशन, रुबी हॉल क्लिनीक पुणे.

आंतररुग्ण कालावधी :- दिनांक १९/१०/२०१६ ते दिनांक ०२/११/२०१६

अ.

| औषधांचा खर्च | |
|---|---|
| एकूण खर्च | एकुण खर्चाच्या ९० % |
| ७८,०६९/- | ७०,२६२/- |

ब.

| वास्तव्याचा खर्च | वास्तव्य खर्चाच्या ९०% |
|---|---|
| एकुण खर्च १,९८,२११/-<br>SDU (I.C.U)<br>५०००x१ = ५०००/- x १००%<br>अतिदक्षता विभाग कक्ष (N T U)<br>५५०० x१४ = ७७,०००/- १००% | १,७८,३९०/-<br><br>५,०००/-<br><br>७७,०००/- |
| एकुण | २,६०,३९०/- |

एकुण खर्च = अ + ब
३,३०,६५२/- = ७०,२६२/- + २,६०,३९०/-
एकुण रक्कम रुपये ३,३०,६५२/- तीन लाख तीस हजार सहाशे बावन्न मात्र.
इतकी रक्कम मंजूरीस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखा अधिकारी यांची A/C ३४४ दि २३/०३/१८ रोजी स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख यांचे प्रस्तावाप्रमाणे व खालील प्रमाणे महासभा ठराव क्रमांक २ दिनांक २६/०५/२०१२ चे ठरावानुसार वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक महासभेपुढे ठेवणे आवश्यक ठरेल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा केली अहमदनगर महानगरपालिका ठराव क्र.३० दिनांक ०७/१२/२०१६ च्या अन्वये वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीची रक्कम रु.३ लाखापेक्षा जास्त असल्यास महासभेपुढे ठेवण्यात यावी असे नमुद असल्याने त्या नुसार मा.महासभेपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी श्री.मच्छिंद्र ध्रुपद म्हस्के, बिगारी/वॉचमन यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास व सदरच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदरच्या प्रकरणात अंतिम कार्यवाही करतांना मा.आयुक्त यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १७** **दिनांक :१४ / ०८ /२०१९.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** सावेडी जॉगींग पार्क हे भाडेने देऊ नये याबाबत...

संदर्भ :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे, महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.०८/०३/२०१९ रोजी दिलेल्या पत्रान्वये.

२) मा.श्री.महेंद्र गंधे मा.श्री.मनोज दुलम, नगरसेवक मा.श्रीमती.आशाताई कराळे नगरसेविका व जॉगींग पार्क परिसरातील नागरिकांनी दिलेल्या निवेदनान्वये.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मा.श्री.बाबासाहेब वाकळे, महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.०८/०३/२०१९, रोजी दिलेल्या पत्रात मा.नगरसेवक मा.श्री.महेंद्र गंधे, मा.श्री.मनोज दुलम, मा.श्रीमती.आशाताई कराळे तसेच सावेडी उपनगरातील व त्या परिसरात राहणारे नागरिकांनी निवेदन देवुन सावेडी येथील सावेडी जॉगींग पार्क येथे नागरीक मोठया संख्येने फिरावयास येतात तसेच व्यायामदेखील करतात. जॉगींग ट्रॅक असलेल्या मैदानावर क्रीकेट, खो-खो, कबड्डी असे खेळ खेळले जातात. सदरचे जॉगींग ट्रॅक म.न.पा.ने भाडयाने दिल्याने मैदानावर मोठेमोठे खड्डे करुन शेड उभारली जाते त्यामुळे मैदानाचे नुकसान होते. तसेच ज्यांना भाडयांना दिले आहत ते अन्न कचरा मोठया प्रमाणावर मैदानावर ठेवुन जातात. मैदानावर नागरिकांनी त्यांच्या खर्चाने झाडे लावली आहेत ती झाडे मंडप उभारताना तोडली जाते. सावेडी जॉगींग पार्क उपनगरातील एकच मैदान असुन त्याचा वापर हा खेळाचे मैदान म्हणुन आवश्यचक असतांना सदरचे मैदान भाडयाने देवुन मेदानाचे नुकसान करतात. मैदान सुरक्षीत राहुन विद्यार्थ्यांना व नागरिकांना मैदानाचा वार होण्याकरीता सदरचे मैदान भाडयाने देण्यात येवू नये असे कळविलेले आहे.

यापुर्वी सन २०११ मध्ये मा.नगरसेविका सुमनताई मोहिनीराज गंधे यांच्या दि.१४/०७/२०१८ च्या पत्रानुसार महासभे समोर ठेवण्या करीता प्रस्ताव तयार केला असता मा.नगररचनाकार यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

सावेडी जॉगींग पार्क हे न.र.यो.क्रं.४ अं.भु.क्रं.२६८ मध्ये विद्यमान असुन अहमदनगर शहराच्या २ री सुधारीत मंजूर विकास योजनेनुसार सदर जागा आरक्षण क्र.३१ व्दारे प्राथमिक शाळा व क्रीडांगण यासाठी आरक्षीत ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर जागेचा वापर विकास योजना प्रयोजना व्यतिरिक्त इतर कारणासाठी करणे उचित होणार नाही. असे या कार्यालयाचे मत आहे.

सदर अभिप्रायानुसार प्रस्ताव महासभेसमोर ठेवला असता खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत आलेला होता.

**ठराव :-** सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान भाडे तत्वावर न देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या व्यापर चर्चेवरुन ठरविण्यात येते की, सदरचा विषय स्थगीत ठेवणेत यावा. मैदान वापरानंतरच्या स्वच्छते बाबत दक्षता घेण्यात यावी. भाडे दरात वाढ करणे बाबतचा प्रस्ताव सन २०१२-२०१३ या अर्थसंकल्पाच्या प्रस्तावात सादर करावा. महासभा ठराव क्र.२२ दिनांक २८/१२/२०११ अन्वये सावेडी जॉगींग पार्क हे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रु.२०००/- + जीएसटी आकारुन दिले जाते व व्यवसायीक कार्यक्रमासाठी भाडे रु.१०,०००/- + जीएसटी आकारुन भाडेने दिले जाते. म.न.पा.ला आतापर्यंत सदर सावेडी

जॉगींग पार्क भाडेने देवुन सन २०१६-२०१७ या वर्षात एकुण भाडे रुपये २,०४,१००/- व सन २०१७-२०१८ या वर्षात रु.४,८२,६००/- व सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात रु.१,३२,१६०/- एवढे उत्पन्न भाडेपोटी मिळालेले आहे.

मा.महापौर साहेब तसेच मा.नगरसेवक, नगरसेविका यांचे पत्रानुसार तसेच नागरिकांचे निवेदना नुसार सावेडी जॉगींग पार्क हे यापुढील काळात भाडयाने द्यावे किंवा कसे याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे बाबत पुढील आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, मा.सहाय्यक नगररचनाकार यांचा अभिप्राय होणे उचित होईल.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, मंजूर विकास योजनेत नरयो क्र.४ अं.भु.क्र.२६८ सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान या जागेवर प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या कारणासाठी आरक्षण आहे. सबब शाळा व खेळाचे मैदान या वापरा करीताच सदर जागेचा वापर करणे आवश्यक आहे. जा.क्र.टी.पी. ३१५४ दिनांक ०३/०७/२०१९ अन्वये पुढे.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, सावेडी जॉगींग पार्क भाडयाने न देण्याबाबतचा विषय मा.महासभेकडे पाठविण्यांस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य महासभेमध्ये ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.आशा कराळे :-** मी महानगरपालिका प्रशासना बरोबर आहे या भुखंडाचे आरक्षण खेळाचे मैदान म्हणुन असल्याने त्याकारणासाठी त्या भूखंडाचा वापर करण्यांत यावा. शिवाजी पार्क हा भुखंड खेळासाठी आरक्षीत झालेला आहे. त्यासाठी वापर करण्यात येत आहे. त्याप्रमाणे या जागेचा वापर करण्यात यावा. भाड्याने दिल्यास ग्राउंडवर कचरा होतो. सर्व नगरसेवकांनी या विषयास मान्यता द्यावी.

**मा.श्री.गंधे महेंद्र :-** ज्या लोकांकडून आपण विद्यमान मालकाकडून ताब्यात घेतो. खेळासाठी आरक्षीत ठेवण्यासाठी घेतले. शेजारच्या अपार्टमेंटने ड्रेनेजचे पाणी सोडले होते. आपल्या बंधूनी ड्रेनेज लाईन बंद केली आहे. शासनाने किंवा नगरविकास खात्याने खेळासाठी आरक्षीत ठेवावा असा निर्णय घेतला असेल तर खेळासाठी निश्चीत करा. दुस-या कारणासाठी हे मैदान वापरण्यासाठी देण्यात येवू नये.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** मुलांना उन्हाळयाच्या सुट्टीत खेळण्यासाठी मैदान उपलब्ध होत नाही. त्या काळात भाडयाने दिले जावू नये. मागच्या महिन्यात २६ दिवस भाडयाने देण्यांत आले होते. नागरिक फिरायला त्या ठिकाणी येतात हास्य क्लब साठी, जॉगींग साठी नागरीक येतात. भाडयाने दिले तर खेळ बंद होतात मोठे खड्डे त्याठिकाणी खोदलेले असतात. जॉगींग ट्रॅक भाडयाने देणे बंद करावे. मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध होईल. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी इतर ठिकाणी मैदान उपलब्ध करुन द्यावे किंवा या मैदानामध्ये एक दिवसासाठी जागा देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** तुम्ही द्या पण म्हणता व नको पण म्हणता.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** सांस्कृतिक कार्यक्रमासाठी इतर ठिकाणी मैदान उपलब्ध करुन द्यावे असे मी म्हटले आहे.

**मा.श्री. महेंद्र गंधे :-** ग्राउंडवर संध्याकाळी वयस्कर नागरीक येतात. वेगवेगळया पध्दतीने खेळासाठी वापर केला जातो. ग्राउंड जर खराब होत असेल तर ते खेळासाठीच राखून ठेवण्यांत यावे. शहरात इतर

मोकळया जागेत अतिक्रमण झालेले आहे. व्यावसायिक कारणासाठी जर हे ग्राउंड दिले तर ते खराब होईल. मुलांचे ग्राउंड विषयी प्रेम कमी होवू लागले आहे. मुलांना जर ग्राउंड उपलब्ध करुन दिले तर बरे होईल. ग्राउंड मुलांसाठी खेळण्यासाठी ठेवावे.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** सन २०१६ ला सर्वांत पहिले पत्र माझे होते. हे खेळासाठी ठेवण्याबाबत मा.महापौर यांचे धन्यवाद मानतो. आरक्षीत ग्राउंड खेळासाठीच वापरण्यात यावे. एक्झीबीशन साठी दिले तर मुलांना प्रॅक्टीससाठी देण्यास शिवसेनेचा देखील पाठींबा आहे. कमर्शियलला बॅन करा. गणपती फटाका स्टॉल सांस्कृतिक कार्यक्रमासाठी देण्यात येवू नये. गंगा उद्याना मागे उपनगरातील व्यवसायिकांना ही जागा दिली तर हे ग्राउंड खेळासाठी उपलब्ध होईल. सांस्कृतिक कारणासाठी गणपती स्टॉलसाठी वाडियापार्क पर्यायी ग्राउंड आपण दिले पाहिजे.

**मा.महापौर साहेब :-** त्याच्या आसपास एखादा प्लॉट उपलब्ध आहे का.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** गंगा उद्यानाच्या मागील बाजूस जागा पार्कसाठी आरक्षीत आहे. मिस्कीनमळयात दीड एकर जागा आहे. रस्ते ७.५० मीटर आहेत. चारही बाजूने रस्ते आहेत.

**मा.श्री.गंधे महेंद्र :-** सिंथेटीक ट्रॅक करीता २ कोटी रक्कम महानगरपालिकेस मिळणार आहे. फक्त आपण इतर कारणासाठी तो भाडयाने देवू नये अशी अट टाकावी लागणार आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** वर्षातून एक दिवस हिंदू नववर्ष सुरु होते त्या दिवशी रसिक ग्रुप सांस्कृतीक कार्यक्रम घेतात ते स्टॉल लावत नाही. फटाका स्टॉल लावत नाही. नगर शहरात एकमेव कार्यक्रम ते घेतात त्यांना तो वापरणेस द्यावा असे माझे मत आहे. निरंतर भवन येथील लोकही एक दिवस कार्यक्रम घेतात ते काही व्यवसाय करीत नाही. नफा कमवत नाही त्यांचा हेतू चांगला आहे. असे एक-दोन कार्यक्रम घ्यायला वर्षातून परवानगी देण्यांत यावी. हिंदू नववर्षाचा चांगला कार्यक्रम ते घेतात. त्यांना बंदी करु नये अशी आमची भावना आहे. हे जे मुले आणली आहेत ती तिथे शिकणारी मुले नाहीत. अशा एकदोन कार्यक्रमास परवानगी देण्यांत यावी.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पूर्ण ग्राउंड खेळाचे मैदान म्हणून आरक्षीत आहे. खेळासाठी त्याचा वापर करण्यांत यावा. व्यावसायीक दृष्टीकोनातून जर करणार असतील तर त्यांना परवानगी देवू नये. गुडीपाडवा कार्यक्रमासाठी त्यांनी जर नुकसान केले तर त्यांचेकडून भरपाई घ्या. इस्कॉन मंदिराचा ओमशांती कार्यक्रम त्या ठिकाणी होतो. नगर जल्लोष, शहर वर्धापन तिथे होतो. अशा चार - पाच कार्यक्रमांसाठी परवानगी देण्यात यावी. वर्षातले १०-१५ दिवस जर याठिकाणी कार्यक्रमासाठी मैदान देण्यांत यावे. आर्थिक हित ज्या ठिकाणी गुंतलेले नाही अशा कारणासाठी देण्यास हरकत नाही.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** कार्यक्रमासाठी देत असतांना आधी एक दोन दिवस व नंतर एक दोन दिवस तयारी करण्यासाठी लागतात.

**मा.श्री.उनवणे :-** जॉगींग ट्रॅकवर पहाटे पासून रात्री पर्यंत खेळ चालू आहेत. खेळाडूंना प्रोत्साहन दिले पाहीजे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** आपल्याला सांस्कृतीकपणा जपायला पाहीजे. मुलांना सुध्दा सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विरोध होणार नाही. कमर्शिअल वापरामुळे ग्राउंड खराब होते. २-३ विषयाला वर्षातून परवानगी देण्यांस हरकत नाही. अटी शर्ती डिपॉझिट घेवून परवानगी द्यावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मुलांसाठी खेळासाठी ग्राउंडचा वापर होतो ग्राउंड फक्त खेळासाठी करणार असाल तर त्याठिकाणी निधी राखून विकसीत करण्यात यावा. सांस्कृतिक व धार्मिक कारणासाठी वर्षातून

काही दिवस जागा दिली पाहीजे ज्या दिवशी एवढी मोठी जागा उपलब्ध होईल त्या दिवशी आपण सांस्कृतिक कारणासाठी वापर करण्यात यावा.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** धार्मिक व सांस्कृतिक कामासाठी या ग्राउंडचा वापर करणेत यावा.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** धार्मिक व सांस्कृतिक यामध्ये स्पेसिफीक पॉईंटचा उल्लेख असावा. कोणत्याही राजकीय पक्षासाठी देण्यात येवू नये.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** सावेडी जॉगींग पार्क भाडयाने देवू नये या मैदानावर कुमार भाउ व स्वप्नील भाउ शिंदे यांनी प्रॅक्टीस केलेली आहे दोन राजकीय खेळाडू या ठिकाणी तयार झालेले आहे. ते ग्राउंड भाडयाने न देता खेळाडूसाठी ठेवावे असे मी भारतीय जनता पक्षाच्या वतीने पाठींबा देतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** महिला बचत गटांचे कष्टाचे काम असते. मिस्कीन मळयालगतचा जो ओपन स्पेस आहे त्याठिकाणी शिफ्टींग करावे. व्यावसायीक कारणासाठी गणपती, फटाका स्टॉल यासाठी मिस्कीन मळा ग्राउंड देण्यांत यावे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** नाट्य गृहाचा विषय लवकरात लवकर मार्गी लावावा.

**मा.महापौर साहेब :-** सावेडी जॉगींग ट्रॅक भाडयाने देवू नये. त्यानुसार सावेडी जॉगींग पार्क कुठल्याही व्यावसायिक वापरासाठी देण्यात येवू नये गणेश भोसले यांनी जसे १-२ सांस्कृतिक कार्यक्रमासाठी देणे बाबत तसेच दिपालीताई बारस्कर यांनी जे अगोदर १-२ दिवस व नंतर १-२ दिवस अशा गोष्टी स्थानिक नगरसेवकांचे पत्र घेण्यात यावे. फक्त खेळासाठी मैदानाचा वापर करावा १-२ दिवसासाठी हे मैदान वापरण्यास परवानगी दिली जाईल. अटी व शर्ती टाकून देण्यात येईल. नविन महानगरपालिकेचे ग्राउंड तयार करुन त्या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येईल.

**मा.सौ.विद्या खैरे :-** पैठणकर यांचे संदर्भात मी पत्र दिले आहे.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** सर्व प्रशासन मा महापौर, सर्व सभागृह यांचे आभार मानतो.

मा.सौ.विद्या खैरे यांनी दिलेल्या पत्राचे वाचन करण्यात आले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** कोणत्या नियमाचा आधार घेवून पैठणकर यांची नेमणूक त्याच विभागात पुन्हा करण्यांत आली.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** आयुक्त साहेब यांचेकडे २९ जुलैला प्रस्ताव ठेवला होता. पैठणकरांना विभागीय चौकशीच्या अधिन राहून हजर करुन घेतले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** त्याच विभागाची चौकशी चालू आहे व पुन्हा त्याच विभागात त्यांची बदली करण्यांत येते.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** २०११ च्या शासन निर्णयामध्ये पुन्हा त्या विभागात नेमणूक देवू नये असा उल्लेख आहे.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** प्रशासकीय कामाचे सोईसाठी त्यांची नेमणूक केली आहे. निविदेचे काम मेहेत्रे यांना दिले आहे. व साफ सफाईचे व कचरा संकलनाचे काम पैठणकर यांना दिले आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** याचा अर्थ तुम्ही त्यांना पुरावे नष्ठ करायला संधी दिली आहे. पैठणकरांच्या विरोधात वेळोवेळी पत्र व्यवहार केले आहेत. एस आय व सर्व कर्मचा-यांनी पत्र दिले आहे. तरी तुम्ही त्यांची नेमणूक त्याच ठिकाणी केली आता १० व्या वित्त आयोगाचा निधी प्राप्त होणार आहे. तरी त्यांना त्या विभागातून हटविण्यांत यावे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पैठणकरांना कामावर घ्यायची काय घाई झाली. निलबीत किती लोक झाले आहेत. पा.नो. जाधव यांचे परिपत्रक माझेकडे आहे. कोणत्या शासनाच्या नियमानुसार त्यांना घेतले.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** त्यांच्या हलगर्जीपणा मुळे शहराचे आरोग्य धोक्यात आहे. सन २०१८ मध्ये ८१ वा नंतर आहे. दैनंदिन साफसफाई होत नाही. नाले सफाई होत नाही. ठिकठिकाणी कच-याचे ढीग आहेत. साथीच्या रोगही प्रसारीत होत आहेत. आरोग्य अधिकारी यांनी काही कार्यवाही केली का.

**मा.महापौर साहेब :-** मेहेत्रे यांना घनकचरा विभागात घेतले तर आर.जी.सातपुते यांनाही इलेक्ट्रीक विभागात घ्या. कोणाचाही विरोध नाही. एकही इलेक्ट्रीक इंजिनियर महानगरपालिकेत नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** हरीत लवादाने किती रुपयांचा दंड महानगरपालिकेला केला.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** यांच्या चुकीच्या कामकाजामुळे महानगरपालिकेला ५० लाख भरावे लागले. आम्हाला एक बल्ब बसवायला पैसे नाही. सातपुते यांना इलेक्ट्रीक विभागास परत घेता येत नाही. दुस-या विभागात घेता येते. चौकशी अहवाल आला असेल म्हणूनच तुम्ही घेतले. सभागृहात अहवाल वाचुन दाखवा मेहेत्रेची नेमणूक उप अभियंता म्हणून आहे. त्यांना कामाचे काय अधिकार दिले. त्यांना घनकच-याचे काम दिले. बांधकाम विभागाकडे अभियंते कमी आहेत. ज्या विभागात निलंबन झाले त्या विभागात नेमता येत नाही.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** चौकशीचा जो मुद्दा होता ज्या आरोपासाठी निलंबीत केले ते काम पैठणकरांकडे दिलेले नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सातपुते यांचे संदर्भात जे नाशिकहून पत्र आले ते वाचून दाखवा.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** वर्ग - १ चे पद असल्याने मंत्रालयाकडे पाठविले. नाशिकहून प्रशासनाने याबाबत निर्णय घ्यावा असे कळविले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सातपुते २ वर्ष झाले बाकीचे लोक घ्यायची घाई का झाली.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** पैठणकरांना ज्या विभागात ठेवू नये. अशी सर्व सभागृहाचे वतीने मागणी करण्यात येते. बकरी ईदच्या दिवशी गाडेच्या वॉर्डात मंदिराजवळ ॲनिमल वेस्ट टाकण्यात आले. महानगरपालिकेने त्या बाबतीत काय कार्यवाही केली.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** हरीत लवादाने महानगरपालिकेला किती दंड केला. याची माहिती द्या.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.श्री.पैठणकर :-** आज अखेर हरीत लवादाने महानगरपालिकेस एकही पैशाचा दंड केलेला नाही.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** महानगरपालिकेचे पैसे कपात करुन घेतले आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** तुम्ही जबाबदार राहताल.अश्वमेघ संस्थेने हायकोर्टात रिट दाखल केला होता. हायकोर्टाने चुकीचे पध्दतीने टेंडर प्रक्रीया राबविली त्यांच्यावर कारवाई करणे बाबत ऑर्डर केली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.श्री.पैठणकर :-** अशी कोर्टाची ऑर्डर नाही. अशी जी काही ऑर्डर असेल त्या चौकशीसाठी मी तयार आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** भोर साहेबांना का घेतले नाही.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** भोर हे बडतर्फ कर्मचारी आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** एखादा कर्मचारी तर खोटा बोलत असेल तर अधिकारी यांनी त्यांना थांबवायला पाहिजे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** चौकशी अहवाल सभागृहा समोर न ठेवता त्यांना कामावर घेतलेच कसे.

**मा.आयुक्त साहेब श्री.पवार :-** डॉ.पैठणकरांना ज्यावेळी निलंबीत केले. त्यावेळी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे चार्ज होता. त्यांना कलेक्टरांच्या सहीने निलंबित केले. २६ जुन रोजी दोषारोप पत्र ठेवले.३-८ ला अहवालात आरोप मान्य नाहीत म्हणून खुलासा दिला. असे सांगुन चौकशी सुरु करीत आहे. पैठणकरांचे उत्तर देतांना माझी अवस्था माफीनामा चित्रपटा सारखी झाली आहे. करतो कोण व उत्तर देतो कोण मी ४ दिवस रजेवर होतो त्यावेळेस मला पैठणकरांना घेतल्याचे लक्षात आले. शासन निर्णयाचे तरतुदी नुसार कार्यवाही व्हायला पाहिजे. डीपीआर अंमलबजावणीचा कार्यभार मेहेत्रे कडे दिला व इतर पैठणकरांकडे दिलेला आहे. एनजीटीच्या वेळेस अगोदर पासून केसेस चालू आहे. एनजीटी च्या आदेशामध्ये दंड असा शब्द नाही. ट्रेझरीच्या अकौंटमध्ये ५० लाख रुपये जमा करावेत तर कारवाई झाली नाही तर ती रक्कम त्या कामी वापरण्यांत आली.

बायोक्रिये नियामेनच्या सॅनि.इन्स्पे. सुनावणीसाठी गेले त्यावेळी त्यांनी सांगीतले ऑगष्ट पर्यंत प्रोजेक्टर पूर्ण करु. १ कोटीची परफॉरमन्स गॅरंटी सादर करावी लागेल. त्यांनी चुकीचे सांगीतले. बुरुडगांव कचरा डेपो मृत जनावरे प्लँट आहे असे सांगीतले बायोक्रिएशनचे काम प्लॅटमध्ये शेवटचे डिस्पोजल करावे. एनजीटी ने सांगीतले या बाबतीत अडचण असेल तर विचारणा करा. इन्स्पेटेशनलॅट उभारावा लागेल. त्यासाठी कालावधी लागणार आहे. कोणत्या कागदपत्राचे आधारे दोषारोप अमान्य केले ते व जे कागदपत्राचे आधारे दोषारोपपत्र दाखल केले ते मुख्यलेखा परिक्षक यांचेकडे देण्यांत येतील साधारण १५ दिवसात चौकशी करण्यांत येईल.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** सर्वोच्च न्यायालयाचे काय आदेश आहेत ते मा महासभेला वाचून दाखविण्यांत यावेत. प्रकल्प अभियंता किंवा पर्यावरण अभियंता यांची नेमणूक करण्यांत यावी. सर्व सन्माननीय नगरसेवकांची मागणी त्यांची इतरत्र बदली करावी.

**मा.आयुक्त श्री.पवार साहेब :-** चुकीची प्रक्रिया यांनी राबविली त्यांच्यावर कारवाई करावी असे हायकोर्टाचे आदेशात आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** त्यांची दुस-या खात्यात बदली करावी त्यांना इलेक्ट्रीक खात्यात पाठवा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** तुम्हाला पत्र दिले आहे का

**मा.आयुक्त श्री.पवार साहेब :-** आयुक्तांनी मला फोनवर कळविले आहे. ते आजारी आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मग आम्ही काय मुर्ख आहोत का याठिकाणी बोलत आहोत. तुम्ही जर निर्णय घेवू शकत नाही मग तुम्ही इथे कसे बसलात.

**मा.आयुक्त श्री.पवार साहेब :-** मी याठिकाणी पैठणकरांचे बदलीचा निर्णय घेवू शकत नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** महासभेचा अधिकार महापौर यांचा आहे. निर्णय देण्याचा. सर्वांचे ऐकुण उद्या निर्णय घ्या.

**मा.आयुक्त श्री.पवार साहेब :-** आयुक्त या नात्याने चर्चा करु शकतो. सभागृहाचे कायदेशीर निर्णयाची अंमलबजावणी करावी लागते.

**मा.श्री.येवले :-** १७ लोकांचे नांवे वाचा कोण-कोण आहेत किती घेतले किती राहीले ते कळू द्या.

**मा.महापौर साहेब :-** निलंबन करण्यात आलेले १७ लोकांमध्ये कोणाला घेतले या बाबतची माहिती सभागृहाला लहारे यांनी द्यावी. अजेंडयावर विषय नसला तरी माहिती सर्व सदस्यांना द्यावी.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** माहिती मागवून घेतो.

**मा.महापौर साहेब :-** थोडया वेळेत माहिती देतील. पुढचा विषय घ्या.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** पैठणकरां वरील कार्यवाही करणार का.

**मा.श्री.अविनाश घुले :-** भोर यांना सेवेत घेणे बाबत मा.स्थायी समितीस ठराव केला त्याची काय कार्यवाही केली.

**मा.महापौर साहेब :-** ते पैसे पर्यावरणाच्या कामासाठी वापरता येतात. दंड झालेली नाही. वेगळया खात्यात जमा केले आहेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** पैठणकरांचा निर्णय घ्या. रुलिंग द्या. हायकोर्टाची ऑर्डर काय आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** निलंबित अधिकारी कर्मचारी यांचे बाबतीत निर्णय घेतांना कुठल्याही प्रकारची चर्चा न करता आपण विषय मंजूर केले ९०% अधिकारी चांगल्या पध्दतीने काम करतात १०% कर्मचारी लोक प्रतिनिधीचे फोन घेत नाही. नागरिकांना काय उत्तर द्यायचे. इलेक्ट्रीकचे शेंडगे यांना दिवस भरात ३-४ फोन केले त्यांचा पुन्हा फोन आला नाही. त्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार काही अधिकारी वेळी अवेळी फोन उचलतात. लोकप्रतिनिधीचे फोन उचलत नाही. अशांच्या बाबतीत काय कारवाई करणार शेंडगे च्या बाबत काय कारवाई करणार.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** भोर साहेबांचा निर्णय काय घेण्यांत आला.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** प्रस्ताव उपायुक्तांकडे ठेवला आहे.

**मा.महापौर साहेब :-** विद्युत विभागाला मी सूचनाकरतो नगरसेवकांच्या तक्रारी नुसार लेखी खुलासा द्यावा. व ते उत्तर समाधानकारक नसेल तर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई प्रस्तावीत करावी.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :-** ठरावाची कॉपी दोन तीन दिवसात प्राप्त झाली.

**उपायुक्त (सा) श्री.पठारे :-** पहिला ठरावात माझ्या नावापुढे जे लिहिले होते ते दुरुस्ती करण्यासाठी पाठविण्यांत आले आहे. दुरुस्ती केल्यावर निर्णय घेवू. एकाचा पुटअप करण्यापेक्षा सर्वांचा निर्णय घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पैठणकर यांना घेण्याची एवढी कार्यवाही का केली.

**उपायुक्त (सा) श्री.पठारे :-** सातपुतेंचे जे पत्र नाशिक विभागाकडून आले निलंबन आढावा समिती गठीत केलेली ती गठीत करावी लागेल. वर्ग १-२ चे शासनाकडे व वर्ग ३-४ साठी नाशिकला विभागीय निलंबन आढावा समिती आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** पैठणकरांचे बाबतीत निर्णय घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पाणी पुरवठा अधिकारी काकडे साहेबांचे चिरंजीव युपीएससी मध्ये भारतात २३ वे क्रमांकवर आले आहे ही आनंदाची गोष्ट आहे. डीवायएसपीचे पदी त्यांची नेमणूक झाली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो व त्यांचे कुटुंबियांचे राष्ट्रवादी पक्षातर्फे अभिनंदन करतो.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** आयएएसच्या परिक्षेसाठी ते योग्य मार्क मिळवून पास झाले. त्यांची युपीएससी मार्फत डीवायएसपी पोस्टींग होवू शकते. महानगरपालिकेचे व सभागृहाचे दृष्टीने गौरवास्पद बाब आहे. भाजपा व सभागृहाचे वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

**मा.श्री.गणेश भोसले :-** पुढच्या सभेत त्यांना सभागृहात बोलावून सभागृहात सत्कार करावा. गुलदगड याचा महाराष्ट्र टाईम्स मध्ये लेख आला आहे. त्याची पूर्ण हिस्ट्री आहे. रेनहार्वेस्टींगचा विषय २०१४ ला बंधनकारक झाला. यांनी बिल्डींग पूर्ण केली.

**सहाय्यक नगररचनाकार श्री.बल्लाळ :-** २००३ पासून कंम्पल्सरी केले आहे. गावठाण मध्ये संबंधीतांना तक्रार केलेली नाही. कंम्प्लीशनच्या वेळी ते पाहीले जाते.

**मा.श्री.गणेश भोसले :-** पर्यावरणाच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. सक्तीने नाहीतर गोडीने करुन घ्या. कंम्प्लीशन आपण कसे देतो. इथुन पुढच्या काळात गोड पाणी भेटणे मुश्कील झाले आहे. यापुढील काळात कंम्प्लीशन देतांना ह्या दोन गोष्टी पाहील्या शिवाय कंम्प्लीशन देवू नये. महानगरपालिकेला आयएसओ मानांकन मिळाले आहे. आनंदाची गोष्ट घडली आहे. कितीतरी महानगरपालिका शाळा बंद पडल्या आहेत. एका शिक्षकाने चांगली शाळा घडविली त्या साठी त्या शिक्षकाचे अभिनंदन त्यांना सुध्दा या ठिकाणी बोलवावे. नगरपालिका शिपाई असो कर्मचारी असो त्याचे अभिनंदन करतो. खडकावर त्यांनी रोपटे उगवले आहे. त्यांचे अभिनंदन करतो पुढच्या सभेत त्यांना बोलवावे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** श्री.काकडे साहेबांच्या चिरंजीव यांची युपीएससी च्या परिक्षेमधुन डीवायएसपी पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे मी अभिनंदन करतो.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. रसिकग्रुप नगर जल्लोष कार्यक्रम, इस्कॉन मंदिराचा ओमशांती कार्यक्रम, श्री समर्थ मंडळ ट्रस्ट, शीख बांधवांचा कार्यक्रम इत्यादी व अशाच इतर एखाद्या कार्यक्रमांसाठी परवानगी देण्यात यावी. त्यांचेकडुन भाडे व डिपॉझिट रक्कम घेण्यात यावी. संबंधितांकडून ग्राउंडची साफसफाई न केल्यास व खड्डे न बुजविल्यास डिपॉझिट रक्कम जप्त करण्यांत यावी. सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान वरिलबाबींकरीता सोडून इतर कारणासाठी भाडे तत्वावर न देणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. जॉगींग ट्रॅक मैदान खराब होवू नये याकरीता चार चाकी व दोन चाकी वाहने व जनावरे यांना जॉगिंग ट्रॅक मैदानात प्रवेश करण्यांस मनाई करण्यांत यावी. प्रवेश केल्यास संबंधित मालकावर दंडात्मक कारवाई करण्यांत यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक :- मा.श्री.महेंद्र मोहनीराज गंधे

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १८** **दिनांक : १४ / ०८ /२०१९.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना राबविणे कामी संपवेल व पंप हाऊससाठी चाहुराणा बु.स.नं.६६/१ रेखांकनामधील ॲमेनिटीचे क्षेत्र ११२०.७५ चौ.मी.इतके भुसंपादन करणे बाबत...

१) म.जी.प्रा.चे जा.क्र.२२७५ दि.२९/०८/२०१७ चे पत्र.
२) स.सं.न.र.अहमदनगर यांचे पत्र क्र.५६०८ दि.१८/०९/२०१७ चे पत्र.
३) या कार्यालयाचे पत्र क्रं.५८४ दि.०५/०९/२०१७ चे पत्र.
४) मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचे दालनात दि.०४/१०/२०१८ रोजी झालेली आढावा बैठक.
५) या कार्यालयाचे पत्र क्र.१६८४ दिनांक ०२/०४/२०१९ रोजीचे पत्र.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विषयांकित योजनेचे काम मे.ड्रीम कन्स्ट्रक्शन, नंदुरबार यांना देण्यात आलेले असुन यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यांत आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत, मलनिस्सारण केंद्र (STP), संपवेल व पंप हाउस, ट्रंक मेन व कलेक्शन सिस्टीम इत्यादी मुख्य कामे अंतर्भुत आहेत.

योजनेच्या कामाचे ठेकेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, PMC यांचेमार्फत योजनेचे वर्कींग सर्व्हेचे काम पुर्ण झालेले आहे. सर्व्हे मध्ये दोन ठिकाणी संपवेल व पंपहाउस दर्शविले आहे. त्यापैकी एक बाबर मळा येथे जागा महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे. याबाबत संदर्भ क्र.२ नुसार आपण कळविले आहे. परंतु दुसरी जागा ही श्री.प्रल्हाद कान्होजी फुलसौंदर व भानुदास एकनाथ फुलसौंदर, फुलसौंदर मळा, बुरुडगांव रोड, अहमदनगर यांचे सर्व्हे नं.६६/१ मध्ये ११२०.७५ स्क्वे.मी.क्षेत्र असलेली ॲमेनिटी क्षेत्र उपलबध आहे.

तसेच सदर सर्व्हे नुसार यापुर्वी संदर्भ क्रं.२ नुसार अस्तित्वातील पाणी पुरवठा विभागाकडील संपवेलची अंदाजे १०००.०० चौ.मी. जागा निश्चित करण्यात आली होती. याठिकाणी नव्याने काम करावयाचे झाल्यास सदर जागेवर लेव्हल्स मध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याचे मा.कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.P.M.C. यांनी सुचित केले नुसार प्रस्तावित संपवेल व पंपहाउस हे श्री.फुलसौंदर यांचे सर्व्हे नं.६६/१ येथे बांधणे आवश्यक आहे. त्यामुळे वरील बाबींचा विचार करता नव्याने संपवेल व पंपहाउससाठी श्री.प्रल्हाद कान्होजी फुलसौंदर व भानुदास एकनाथ फुलसौंदर, फुलसौंदर मळा, बुरुडगांव रोड, अहमदनगर यांचे सर्व्हे नं.६६/१ मध्ये ११२०.७५ स्क्वे.मी.क्षेत्र असलेली ॲमेनिटी क्षेत्र उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे.

या कार्यालयाने पत्र क्र.१६८४ दिनांक ०२/०४/२०१९ अन्वये मा.सहसंचालक, नगररचना नाशिक विभाग, नाशिक यांचा अभिप्राय मागणी केली असता त्यांनी संदर्भीय पत्र क्र. ५ च्या विषयामध्ये भुयारी गटार योजना राबविण्यासाठीचे बांधकाम असे नमुद केले आहे मात्र सदरहु पत्राच्या शेवटच्या परिच्छेदात "पाणी पुरवठा" राबविण्यासाठीचे नमुद आहे. त्या अनुषंगाने अहमदनगर शाखा कार्यालयाने पाणी पुरवठासाठी बांधकाम करावयाचे गृहीत धरता येईल. तसेच "ड" वर्ग महानगरपालिकेसाठीच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.२४.४ नुसार सुविधा क्षेत्रामध्ये अनुज्ञेय वापराच्या यादीमध्ये अन्य वापरा बरोबर Water supply, Electricity sipply & Includes other utilities services & conveniences हे वापर अनुज्ञेय असतांना देखील सदर वापर अनुज्ञेय करणे बाबत विचारणा केली असल्याने सुविधा क्षेत्रात भुयारी गटार योजनेच्या संपवेल व पंपहाउसच्या बांधकामासाठीचा वापर अनुज्ञेय करण्यास हरकत नाही.

असा अभिप्राय मा.संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांना मा.सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्र.७६९ दिनांक १६/०५/२०१९ अन्वये अभिप्राय दिलेला आहे.

सदर विषयांकित ॲमेनिटी भुखंड भुसंपादन करणे आवश्यक असल्याने या जागेचे वार्षिक दर मूल्य तक्त्याप्रमाणे येणारे मुल्यांकन व भुसंपादन अधिनियमाप्रमाणे जमीन मालकाला द्यावयाची अंदाजे एकुण रक्कम याबाबतची माहिती खालील प्रमाणे सादर करीत आहे.

I) जमिनीचे क्षेत्र ११२०.७५ चौ.मी.

II) विषयांकित जागेचा (वार्षिक मुल्या दर तक्त्याप्रमाणे भाग क्र.६/२ ) - २६००

III) सदरचाभुखंड ६.०० मी.रुंद रस्त्याच्या सन्मुख आहे. (R-१ झोन मध्ये आहे.) त्यामुळे त्यात अनुज्ञेय वापरास खुप मर्यादा आहेत सबब सदरचे दरात १५% घट देणे योग्य होईल. त्यानुसार दर = २६००x०.८५=२२१०/-

IV) ५००.०० चौ.मी. x २२०१/- x १०० % = रु. ११,०५,०००/-

V) ६२०.०० चौ.मी. x २२१०/- x ९०% = रु.१२,३३,१८०/-

VI) जमिनीचे एकुण मुल्य रु.२३,३८,१८०/-

VII) दिलासा रक्कम (सोले शीएम) १०० टक्के = रु.२३,३८,१८०/-

VIII) मुळ किंमत + दिलासा रक्कम रु.२३,३८,१८०/- + रु.२३,३८,१८०/- = ४६,७६,३६०/-

जमिनीचे एकुण मुल्यांकनाच्या दुप्पट इतकी रक्कम भुसंपादन पोटी जागा मालकास द्यावी लागेल, जमिनीचे एकुण मुल्य रु.४६,७६,३६०/- म्हणजेच रुपये शेहचाळीस लाख शहात्तर हजार तीनशे साठ इतकी रक्कम जागा मालकास द्यावी लागेल. सदरचा भुखंड मंजुर विकास योजनेमधील प्रस्ताव नसल्याने उक्त भुसंपादनाची रक्कम विकासभार या निधीतुन खर्च करता येणार नाही. सदरची रक्कम महानगरपालिका फंडातुन खर्च करणे बाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणे बाबत संबंधित विभागास आदेश होणे व सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करणे योग्य होईल.

आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, १) महासभेमध्ये प्रस्ताव ठेवावा. २) तांत्रिक बाबी पूर्ण होईपर्यंत आगाउ ताबा घेवून काम सुरु करणे आवश्यक आहे.

यावर मा.आयुक्त सो यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर सो यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** शेवटचा विषय मंजूर करण्यांत येत आहे. पैठणकरांचे बाबतीत आजच आयुक्त साहेबांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. शरण मार्केटच्या बाबतीत मागील सभेत नगररचना विभागाने दुसरी जागा घेण्यात यावी.

**मा.श्री.शेख मुदस्सर :-** शरण मार्केटच्या ठरावानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** मागील सभेत भुयारी गटर योजनेच्या कामात जे पाईप वापरले जातात ते छोट्या साईजचे आहेत. ते मोठे वापरण्या बाबत चर्चा झाली होती.

**मा.महापौर साहेब :-** पाईप जर लहान असतील तर मोठे पाईप वापरण्यांत यावे. या प्रकारेच बाबर मळा येथे नदीच्या कडेला संप व पंप करणेसाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबतच्या विषयाला मान्यता देण्यांत

येत आहे. व इतरही आरक्षीत जागा असल्यास ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करावी.अमृत योजने अंतर्गत भुयारी गटार व पाणी पुरवठा विषयक कामांसाठी तदनुषंगिक येणा-या कामास व खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** बाबर मळा येथे नदीच्या कडेला संप व पंप करणेसाठी जागा उपलब्ध करुन (खरेदी करुन) घेणे बाबतचे अधिकार मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब यांना देण्यांत यावेत.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** आयुक्त यांनी डॉ.पैठणकर यांचे बदली बाबत जे आदेश दिले ते सभागृहात गृहीत धरतो.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. मा.केंद्र शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत भुयारी गटार योजना राबविणे कामी श्री प्रल्हाद कान्होजी फुलसौंदर व श्री.भानुदास एकनाथ फुलसौंदर सर्व्हे नं.६६/१ चाहुराणा बुद्रुक ॲमिनीटी ११२०.७५ स्क्वे.मीटर क्षेत्र हे संपवेल व पंप हाउस राबविणे कामी खरेदी करणेस व त्यापोटी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सिना नदी प्रदुषण संदर्भात मा.हरीत लवाद, पुणे येथे सुनावणी चालू असून, याच योजनेअंतर्गत बाबर मळा येथे संपवेल व पंप हाउस साठी जागा उपलब्ध करुन सदर जागा खरेदी करणेस व त्यापोटी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत असून जागा खरेदी करणेस व खर्च करणेकामी मा.महापौर व मा.आयुक्त यांना मान्यता देण्याचे अधिकार देणेत येत आहेत.

सर्व्हे नंबर २२८, २२९ व इतर एकुण २ हेक्टर जागा जी आरक्षीत केली आहे ती जागा सुध्दा ताब्यात घेण्या बाबत वरिल प्रमाणेच तात्काळ कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

अमृत अभियाना अंतर्गत मंजूर DPR नुसार भुयारी गटार योजने अंतर्गत समाविष्ट असलेले १५० एम.एम. ते १२०० एम.एम.व्यासाचे पाईप्स हे ज्या ठिकाणी जास्त लोकसंख्या आहे. त्या भागामध्ये (सदर व्यास) टाकल्यास लहान व्यासामुळे मैला युक्त पाणी वाहणार नाही. गटार तुंबले जातील अशा तक्रारी व निवेदने देवून नागरिक व मा.नगरसेवकांनी व्यास बदलणे बाबत मागणी केली आहे. झोन २ मध्ये आज मितीला सुमारे २ लाख ५० हजार लोकसंख्या असून सदर मागणीचा विचार करता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचे मार्फत नव्याने सर्वेक्षण करुन सदर व्यास हा आवश्यक त्या-त्या प्रमाणात मोठा करणेच्या कामास व येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा व भुयारी गटार योजना राबवित असताना इतर कामे जसे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान भरपाई, रेल्वे क्रॉसींग चार्जेस, योजना मान्यतेवेळी झालेली वाढीव रक्कम, ॲप्रोच रस्ते इत्यादी तद्नुषंगीक कामे हे महानगरपालिकेचे हिश्या मधील १४ व्या वित्त आयोग, कर्जाव्दारे उभारण्यात आलेला निधी व मनपा निधी यामधुन खर्च करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

अनुमोदक :- मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.